IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 02 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# महात्मा बसवेश्वरांची शिकवण

**प्रा. बप्पासाहेब रामलिंग शेजूळ**
सहायक प्राध्यापक इतिहास विभाग के. एन. भिसे आर्टस्, कॉमर्स अँड-
विनायकराव पाटील सायन्स कॉलेज, भोसरे (कुर्डूवाडी) ता.माढा जि. सोलापूर

**Article Info**

***Article History:***
Received: 20th February 2026
Accepted: 01st March 2026
Published: 07th March 2026

***Keywords:***
*संतांची भूमी, भारतीय संस्कृती व धर्म*

**ABSTRACT**

भारत ही संतांची भूमी आहे. या भूमीत अनेक लहान मोठे संत होवून गेले. शंकराचार्य, रामानुजाचार्य, रामानंद, कबीर, तुलसीदास, नामदेव, ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम इत्यादी संतानी भक्तीच्या मार्गाने ईश्वरप्राप्तीवर भर दिल्याची दिसते. भारतीय संस्कृती व धर्म यांचे संवर्धन आणि संरक्षण करण्याचे कार्य संतानी केले. त्यातीलच एक संत म्हणजे महात्मा बसवेश्वर होत. आधुनिक भारतातील सामाजिक परिवर्तनाच्या आणि धार्मिक जागृतीच्या संदर्भात महात्मा बसवेश्वरांच्या शिकवणुकीला एक विशेष अर्थपूर्णता प्राप्त होते. आज शिक्षण, व विज्ञान-तंत्रज्ञानातील प्रगतीने समाजातील रूढी-परंपरा, अंधश्रद्धा, कर्मकांड, जातीप्रथा, भेदभाव, इत्यादींना थारा मिळत नसल्याचे दिसत आहे. आजच्या काळाला सुसंगत वाटावी अशी शिकवण महात्मा बसवेश्वरांनी सुमारे ८०० वर्षापूर्वी १२ व्या शतकातच दिल्याची दिसते. त्यामुळे ते किती दूरदृष्टीचे संत होते हे लक्ष्यात येते.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: March 01, 2026
Similarity Index: 3%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite: Shejul, Bappasaheb Ramling.** (2025). महात्मा बसवेश्वरांची शिकवण. *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 2(I), **228–233**.

**प्रस्तावना -**

भारत ही संतांची भूमी आहे. या भूमीत अनेक लहान मोठे संत होवून गेले. शंकराचार्य, रामानुजाचार्य, रामानंद, कबीर, तुलसीदास, नामदेव, ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम इत्यादी संतानी भक्तीच्या मार्गाने ईश्वरप्राप्तीवर भर दिल्याची दिसते. भारतीय संस्कृती व धर्म यांचे संवर्धन आणि संरक्षण करण्याचे कार्य संतानी केले. त्यातीलच एक संत म्हणजे महात्मा बसवेश्वर होत. आधुनिक भारतातील सामाजिक परिवर्तनाच्या आणि धार्मिक जागृतीच्या संदर्भात महात्मा बसवेश्वरांच्या शिकवणुकीला एक विशेष अर्थपूर्णता प्राप्त होते. आज शिक्षण, व विज्ञान-तंत्रज्ञानातील प्रगतीने समाजातील रूढी-परंपरा, अंधश्रद्धा, कर्मकांड, जातीप्रथा, भेदभाव, इत्यादींना थारा मिळत नसल्याचे दिसत आहे. आजच्या काळाला सुसंगत वाटावी अशी शिकवण महात्मा बसवेश्वरांनी सुमारे ८०० वर्षापूर्वी १२ व्या शतकातच दिल्याची दिसते. त्यामुळे ते किती दूरदृष्टीचे संत होते हे लक्ष्यात येते.

बसवेश्वर हे बसवन्ना या नावानेही ओळखले जातात. भारतातील एक श्रेष्ठ संतांमध्ये त्यांची गणना केली जाते. एक बंडखोर संत, श्रेष्ठ कन्नड कवि, योगी पुरुष, कळकळीचे समाजसुधारक आणि गौतम बुद्ध, वर्धमान महावीर, मोहम्मद पैगंबर, गुरुनानक, येशू ख्रिस्त, इत्यादीप्रमाणे ते प्रमुख धर्मप्रेषित होत. त्यांनी वीरशैव धर्माची स्थापना केल्यामुळे कर्नाटकातील नव्या युगाचे प्रेषित म्हणूनच त्यांना ओळखले जाते. महात्मा बसवेश्वर हे तत्कालीन काळातील एक जेष्ठ समाजसुधारक तथा धर्मप्रसारक आणि राष्ट्रसंत होते. त्यांना मध्ययूगीन भारताचे जनक, जगतज्योति आणि महात्मा असेही संबोधले जाते.

१२ व्या शतकातील इ.स. ११३१ ते ११६७ हा बसवेश्वरांचा जीवनकाळ मानला जातो. त्यांचा जन्म इ.स.११३१ मध्ये अक्षय तृतीयेच्या दिवशी कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील इंगळेश्वर-बागेवाडी या ठिकाणी एका सुप्रतिष्ठित ब्राम्हण कुटुंबात झाला. त्यांचे वडील मादीराज उर्फ मादरस हे बागेवाडी गावचे प्रमुख होते. त्यांच्या कार्यामुळे त्यांना 'ग्रामणिमणि' हा किताबही मिळाला होता. ते सरळमार्गी, विद्याप्रेमी, व धार्मिक प्रवृतीचे गृहस्थ होते. तर माता मादंबा या श्रद्धाळू असून बागेवाडी च्या नंदीश्वर या ग्रामदेवतेच्या परमभक्त होत्या. बसवेश्वर हे त्यांचे तिसरे अपत्य होते. त्यांचा मोठा भाऊ देवराज आणि मोठी बहिण नागम्मा हे होत. त्यांनी पुढील काळात बसवेश्वरांच्या सामाजिक व धार्मिक कार्यात सक्रीय सहभाग घेतल्याचे दिसते. ते बालपणापासूनच स्वतंत्र व बंडखोर प्रवृत्तीचे होते. सनातनी ब्राम्हण कुटुंबात जन्मल्यामुळे त्यांना आपल्या घरातील व बाहेरील परिस्थितीची जाणीव झाल्याचे दिसते. कडक विधी, उपासतापास, कर्मकांड, पाळले जाणारे रितीरिवाज, धर्माच्या नावाखाली अंधश्रद्धेचा आणि पोथीनिष्ठेचा पगडा लोकांच्या मनावर जास्त असल्याचे त्यांना जाणवले. याचा त्यांच्या मनावर मोठा परिणाम झाला. हे त्यांच्या चिकित्सक बुद्धीला पटणारे नव्हते. म्हणून त्यांनी वयाच्या ८ व्या वर्षीच बंडखोरी करून आपल्या मुंज विधीला नकार देवून घरदार सोडून कुडलसंगम ला गेल्याचे दिसते.

बसवेश्वरांवर सर्वात जास्त प्रभाव दिसून येतो तो म्हणजे कुडलसंगमातील थोर शैव संत श्री. जातवेदमुनी यांचा. त्याचवेळी त्यांनी बसवेश्वरांची बुद्धिमत्ता व प्रगल्भता ओळखली होती. कुडलसंगम हे तत्कालीन काळतील एक भलेमोठे विद्यापीठच होते आणि त्याचे प्रमुख होते जातवेदमुनी. त्यांनी बसवेश्वरांना आपल्या आश्रमात आश्रय दिला. हे कुडलसंगम कृष्णा व तिची उपनदी मलप्रभा नदीच्या संगमावर वसलेले होते. त्या ठिकाणी महत्वाच्या धार्मिक, अध्यात्मिक विषयावर चर्चा होत असत. वेद, पुराणे, उपनिषदे, यांचा त्यांनी बारकाईने अभ्यास करून जातीभेद नष्ट करून सर्वसामान्य आणि जातिबहिष्कृत लोकांना

आध्यात्मिक साक्षात्काराच्या दैवी अनुभूतीपर्यंत पोहोचविण्यासाठी आयुष्यभर संघर्ष केल्याचे दिसते. त्यांनी निर्माण केलेले सामाजिक-धार्मिक विचारपीठ म्हणजेच अनुभवमंडप हे देशाच्या विभिन्न प्रांतातील साधकांचा प्रेरणास्रोत ठरल्याचे दिसते.

वीरशैव धर्म हा भारतातील अतिप्राचीन धर्म होय. त्याची स्थापना बसवेश्वरांनी केली. ते वीरशैव धर्माचे परमभूषण, अस्मिता, सारसर्वस्व होत. हा धर्म मूलतः एकेश्वरवादी होता. त्यांनी एकेश्वरवादाचा पुरस्कार करून शक्तियुक्त शिव हाच सर्वज्ञ, सर्वशक्तिमान,व विश्वनिर्माता मानला. सुमारे १२ वर्षे ते कुडलसंगमात राहिले त्या ठिकाणी त्यांनी अगाध ज्ञान प्राप्त केले. आणि आपल्या गुरूंच्या आज्ञेवरून त्यांनी आपला मामा बलदेव यांची मुलगी गंगाम्बिका आणि कलचुरी घराण्यातील राजा बिज्जाळाची बहीण नीलाम्बिका यांच्याशी विवाह करून गृहस्थ धर्म स्वीकारला. त्याचबरोबर त्यांनी बिज्जाळाच्या दरबारातील भंडारी (कोषाधिकारी) हे पद स्वीकारल्याचे दिसते. एवढे सर्व असतानाही त्यांची राहणी साधी, विनम्र व उच्च विचारसरणी असल्याचे दिसते. त्यांनी जातिप्रथा मानली नाही की उच्च-नीच भेदभाव केला नाही. ८०० वर्षापूर्वी त्यांनी ब्राम्हण असणाऱ्या मधुवरसाची मुलगी आणि अस्पृश्य असलेल्या हरळय्या चा मुलगा यांचा विवाह घडवून एक मोठी सामाजिक क्रांती केल्याचे दिसते. ही घटना म्हणजे तत्कालिन काळातील सामाजिक नियमांच्या विरोधातील एक बंडखोर घटना होती. सनातन्यांच्या मते तो धर्म बुडविणारा वर्णसंकर होता. या घटनेमुळे सनातन्यांनी राजाकडे तक्रारी केल्यामुळे आणि तक्रारीचा जोर मोठा असल्याने राजाला झुकावे लागले. आणि त्याने मधुवरस आणि हरळय्या यांना साखळदंडाने बांधून त्यांना हत्तीच्या पायाखाली द्यावे लागले. मात्र बसवेश्वरांनी तथाकथित वर्णव्यवस्थेची पर्वा न करता वर्णव्यवस्थेचे निर्मुलन करण्यासाठी आयुष्यभर लढा दिला.

**शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये -:**

प्रस्तुत शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतील.

१. बसवेश्वरांच्या जीवन कार्याचा आढावा घेणे.

२. बसवेश्वर कालीन तत्कालिन सामाजिक, धार्मिक परिस्थितीचा आढावा घेणे.

३. बसवेश्वरांचे विचार स्पष्ट करणे.

४. बसवेश्वरांची शिकवण स्पष्ट करणे.

**व्याप्ती व मर्यादा -:**

प्रस्तुत शोधनिबंध हा बसवेश्वरांच्या सामाजिक, धार्मिक, विचार आणि शिकवणुकीशीच मर्यादित असेल. त्याचा इतर कोणाशीही काहीही संबंध नसेल.

**संशोधन पद्धती -:**

प्रस्तुत शोधनिबंध पूर्ण करण्यासाठी ऐतिहासिक , विश्लेषण, व वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला.

**बसवेश्वरांची शिकवण -:**

विश्वातल्या बहुतेक संत महात्म्यांनी आत्मज्ञानी होण्यावर अधिक भर दिलेला दिसतो. स्वतःची ओळख ही महत्वपूर्ण आहे. त्यांनी शिवालाच आदि आणि अनंत मानले आहे. वैदिक धर्मातील जातिव्यवस्था, वर्णव्यवस्था, उच्चनीचता, अस्पृश्यता,

कर्मकांड, अंधश्रद्धा, रूढी-परंपरा, बहुदेववाद यांना त्यांनी विरोध केल्याचे दिसून येते. त्यांनी धर्माचा दांभिकपणा लोकांसमोर आणला. त्यामुळे बसवेश्वरांनी निर्माण केलेल्या वीरशैव धर्माकडे अनेक लोक आकर्षित झाले.

त्यांनी मानवतेला प्रथम प्राधान्य देवून दह्म म्हणजे सामाजिक जबाबदारीतून एकसंध झालेले आंतरिक विचार असा एक सिद्धांत मांडला. जेवढी आपण लोकांची सेवा करू तेवढे आपण देवाच्या अधिक जवळ जावू असे ते म्हणत. खालील प्रमुख मुद्द्यांच्या आधारे आपण बसवेश्वरांची शिकवण अभ्यासू शकतो-

**१. मानवतेचा पुरस्कार -:**

बसवेश्वरांनी सर्व मानवजात ही जन्माने तसेच हक्क व दर्जाने समान आहेत असे प्रतिपादन केले. त्यांनी जात-पात , उच्च-नीच, गरीब-श्रीमंत असा भेदभाव केला नाही. ईश्वराने निर्माण केलेल्या साधन सुविधेवर सर्व मानवांचा समान अधिकार आहे असे त्यांचे मत होते.

**२. स्वातंत्र्याचा पुरस्कार -:**

प्रत्येक मूल हे वेगळे असून ते जन्मतःच स्वतंत्र आहे. त्याला आपल्या मनाप्रमाणे स्वतःचे जीवन जगण्याचा अधिकार आहे. त्याच्यावर कुणीही हक्क दाखवू शकत नाही किंवा त्यांना कुणीही गुलाम बनवू शकत नाही. त्यासाठी स्वतःचे संरक्षण करण्याचा त्यांना अधिकार आहे.

**३. एकेश्वरवादाचा पुरस्कार -:**

बसवेश्वरांनी बहुदेव वादाचा विरोध करून एकेश्वरवादाचा पुरस्कार केल्यचे दिसते. त्यांच्या मते, 'देव एक नवे अनेक' असे देवाचे स्वरूप त्यांनी लोकांसमोर मांडले. ते शिवोपासक असल्याने भगवान शिव यांनाच आदी व अनंत मानून सृष्टीचे सर्वेसर्वा मानले आहे. ते म्हणत-

" पिता तुम्ही, माताही तम्ही,
बंधू तुम्ही, आप्तही तुम्हीच,
तुम्हाविण न दुजा,
हे कुडलसंगमदेवा."

शिवोपासना हे विरशैवांचे आद्य धर्मकर्तव्य होय. त्यांनी आपल्या अंगावर नित्य धारण करावयाच्या इष्ट्लिंग स्वरूपातच शिवाची उपासना करण्यावर भर दिला.

**४. कर्मकांडाला विरोध -:**

बसवेश्वरांनी कर्मकांडाला विरोध केल्याचे दिसते. बहुदेवाची उपासना, यज्ञविधीचा फोलपणा, अंधश्रद्धा, तीर्थस्थान, मंत्र, मुहूर्त, होम, बळी, इत्यादी कर्मकांडाला विरोध केला. जनसेवा हीच ईश्वरसेवा मानली.

**५. दया हेच धर्माचे मूळ -:**

दया हेच धर्माचे मूळ मानून बसवेश्वरांनी मानवाच्या जीवनात अजाणतेपणी होणारया
एखाद्या कृतीसाठी त्याला कोणत्याही प्रकारची शिक्षा देवू नये. त्यासाठी त्याला क्षमा करणे

गरजेचे आहे. 'दया, क्षमा, शांती, तेथे देवांची वस्ती' अशी शिकवण त्यांनी दिली.

**६. ईश्वरप्रातीसाठी अंतरंग व बहिरंग शुद्धी आवश्यक -:**

प्रत्येक व्यक्तिला ईश्वरोपासनेचा अधिकार आहे. मात्र त्यामध्ये अहंपणा, ढोंगीपणा नसावा. त्यासाठी मानवाचे अंतरंग व बहिरंग शुद्ध असावे. असे ते म्हणत. आपले मन, भावना, विचार, कृती, वर्तन, आचार हे शुद्ध असावेत तरच मानवाला ईश्वरप्राती होईल.

**७. सप्तवर्तन सूत्राचा अवलंब -:**

महात्मा बसवेश्वरांनी आचरण करत असताना सात सूत्रांचा अवलंब करण्याचा आग्रह धरला आहे. ते म्हणतात - " नका करू चोरी, नका करू हत्या,

नका बोलू असत्य, नको धरू मणी द्वेष,
नको करू आत्मस्तुती, नको करू निंदानालसती,
नको माणू कोण तुच्छ".

हे सात सूत्र पालन केल्याने मानवी जीवन सुकर होण्यास मदत होईल.

**८. स्त्रीविषयक समतावादी दृष्टीकोन -:**

अनेक धर्माने स्त्रियांना शुद्र मानून गौण स्थान दिले आहे. त्याचबरोबर अपवित्रतेच्या सर्व कल्पना या स्त्रीयांभोवती लपेटन्यात आल्या. मात्र बसवेश्वरांनी सर्व स्तरातील स्त्रियांसाठी समतावादी दृष्टीकोन स्वीकारल्याचे दिसते. त्यांच्या मते, 'स्त्री ही कोणत्याच बाबतीत पुरुषांपेक्षा कमी असूच शकत नाही'. त्यांनी स्त्री-पुरुष समान मानून स्त्रियांच्या शक्ति, बुद्धी, प्रतिभा, व कर्तृत्व यांची ओळख सर्व जगाला करून दिली. आज जगामध्ये स्त्री-पुरुष समानता आहे मात्र ही समानता बसवेश्वरांनी १२ व्या शतकात मानली यावरून बसवेश्वरांची सुधारणावादी दृष्टी लक्ष्यात येते.

**९. परिश्रम हाच परमेश्वर -:**

बसवेश्वरांनी श्रमाला अतिशय महत्वाचे स्थान दिले आहे. त्यांचा मते, 'देव, दैव, योग, नशीब, कर्मकांड करीत बसले तर आयुष्यात आपल्याला काहीही मिळणार नाही'. स्वकष्टातून अर्थार्जन करून स्वाभिमानाने जीवन जगण्यासारखा श्रेष्ठ आनंद कोणताही नाही. परीश्रमा मधेच जीवनाची सार्थकता असल्याचे ते सांगतात. तसेच परिश्रमाशिवाय परमेश्वर प्राप्ती नाही दैववाद व निवृत्तिवाद हे मानवाला निष्क्रिय बनवतात. त्यासाठी त्यांनी श्रम, कर्तृत्व महत्वाचे मानले.

**१०. स्वर्ग-नरक विषयक वास्तववादी दृष्टीकोन -:**

प्राचीन काळापासून विविध धर्मात स्वर्ग-नरक ही संकल्पना मांडली गेली आहे. ही संकल्पना पाप पुण्याशी निगडीत आहे. मात्र बसवेश्वरांनी ही संकल्पना भ्रामक मानून वास्तववादी दृष्टीकोन स्वीकारल्याचे दिसते. त्यांचा मते, 'देव-दानव, पाप-पुण्य, सुख-दुख, स्वर्ग-नरक हे जर कोठे असेल तर ते येथे पृथ्वीवरच आहे'. या सर्व बऱ्या वाईट गोष्टींचा अनुभव मनुष्याला इथेच याच जन्मी व याच देही येत असतो. तेंव्हा सुखरूपी स्वर्गाच्या लाभासाठी आणि दुखरूपी नरकाच्या त्यागासाठी बसवेश्वरांनी शुद्धभक्ती, नीति, व कर्तव्यपूर्ती यांचा मार्ग सांगितल्याचे दिसते. त्यांचा मते प्रयत्न हाच परमेश्वर होय.

अश्या प्रकारे बसवेश्वरांनी मानवता, दया, क्षमा, समता, बंधुत्व, श्रम, कर्तृत्व, मी पणाचा त्याग इत्यादी तत्वांचा स्वीकार करून मानवतेची व समानतेची शिकवण दिली. बसवेश्वरांनी व्यापक दृष्टिकोन ठेवून व्यक्तीची उन्नती, सामाजिक विकास आणि मानवातील सद्भाव जागृत करून प्रत्येकाला माणूस म्हणून जीवन जगण्या मान्यता मिळणे हीच खरी मानवसेवा आहे. विश्वाला कुटुंब मानून जीवाला शिवत्व मिळवून देणे हीच बसवेश्वरांची शिकवण असल्याचे दिसते.

**निष्कर्ष -:**

प्रस्तुत शोध निबंधाच्या अभ्यासातून खाली प्रकारचे निष्कर्ष निघतात.

१. बसवेश्वरांनी मानवतेची व समतेची शिकवण दिली.

२. बसवेश्वरांनी उच्च-नीच भेदभाव मानला नाही.

३. परिश्रमाला महत्वाचे स्थान दिल्याचे दिसते.

४. जातीभेद व वर्णभेद स्वीकारला नाही.

५. आधुनिक समाज निर्मितीचा पाया घातला.

**समारोप-:**

सुमारे ८०० वर्षापुर्वी १२ व्या शतकातच जातिप्रथा व कर्मकांड यांना विरोध करणारे एक क्रांतिकारी संत महात्मा बसवेश्वर हे अखंड हिंदुस्थानातील आद्य समाजसुधारक होत. त्यांनी समतावादी धोरण स्वीकारून वीरशैव धर्माच्या माध्यमातून सामाजिक व धार्मिक क्षेत्रात क्रांती घडवून आणली. तत्कालीन महात्मा बसवेश्वरांची शिकवण ही आजही आपल्याला महत्वाची आहे. सामाजिक व आध्यात्मिक क्षेत्रातील समता हे बसवेश्वरांच्या वीरशैव धर्माचे मूळ तत्व होते. त्या आधारे त्यांनी सामाजिक परिवर्तन घडवून आणले. १२ व्या शतकात बसवकल्याण मध्ये झालेल्या मधुवरस व हरळय्या यांच्या आंतरजातीय विवाहामुळे एक क्रांती घडून आली. त्यांच्या क्रांतिकारी कृतीचा आंतरराष्ट्रीय मानवी हक्क आयोग व भारतीय संविधान आज गौरव करत आहेत.

**संदर्भ साधने -:**

१. दर्गा रमजान, बसवेश्वरांचा विश्वसंदेश, बार्टी प्रकाशन, पुणे.

२. पाठक प्रा. पां., चेतना चिंतामणी श्री बसवेश्वर, सुविद्या प्रकाशन, सोलापूर.

३. ३. तिप्पेरुद्रस्वामी एच., बसवेश्वर-भारतीय साहित्याचे निर्माते, साहित्य अकादमी प्रकाशन, नवी दिल्ली.

४. घुगरे सुर्यकांत, जगतज्योति बसवेश्वर, महारष्ट्र बसव समिती, नांदेड.

५. www.basveshwar.org.in